# प्रद्युम्न
## सन ऑफ कृष्णा

**उषा नारायणन**

अनुवाद

**उज्ज्वला गोखले**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Pradyumna Son of Krishna : Usha Narayanan
Marathi translation by Ujjwalla Gokhale
First published in English by Penguin Metro Reads, Penguin Books India, 2015
Copyright © Usha Narayanan 2015
First published in Marathi by Riya Publications in arrangement
with Penguin Books India.

**प्रद्युम्न : सन ऑफ कृष्णा :** उषा नारायणन

अनुवाद : उज्ज्वला गोखले

**प्रकाशक**

रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**

उज्ज्वला गोखले
बी/१५ 'सुजिवन' सोसायटी,
रामभाऊ बर्वे मार्ग, विलेपार्ले (पूर्व)
मो. नं. : ९८२०१४११४९

**अक्षरजुळणी**

अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**

ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**

ऑगस्ट २०१६

**किंमत**

₹ ४००/-

# अर्पणपत्रिका

माझी आजी जानम्मा : एक अद्वितीय आणि प्रेमळ व्यक्तिमत्त्व

ओम नमो भगवते तुभ्यम वासुदेवाय धीमही प्रद्युम्नाय अनिरुद्धाय नमः संकर्षणाय का वासुदेवाच्या प्रद्युम्न, अनिरुद्ध आणि संकर्षण या महान अवतारांचे नामस्मरण करूया.

## *आभार*

श्रीनाथला मनापासून धन्यवाद. त्याच्या कल्पक सूचनांमुळे या पुस्तकाला आगळेवेगळे परिमाण आणि नाट्य लाभले. अविरत पाठिंबा आणि प्रोत्साहन याबद्दल श्रीयाचेही आभार. तिच्यामुळे मी पुस्तकाच्या मूळ संकल्पनेपासून ढळले नाही. कुमारनचेही खास आभार. त्याच्या दूरदृष्टीमुळेच हे पुस्तक या स्वरूपात प्रसिद्ध होऊ शकले. वैशाली माभूर या कोणत्याही लेखकासाठी अगदी आदर्श संपादक आहेत. त्यांच्याविषयीही कृतज्ञता व्यक्त करते. शतरूपा घोषालने डोळ्यात तेल घालून पुस्तकासंबंधी अगदी बारीकसारीक तपशिलाकडेही लक्ष पुरवले. जय ठाकूर आणि पिया अलिझ हजारिका यांनी अतिशय समर्पक मुखपृष्ठ तयार केले आणि पेंग्विन रँडम हाऊसच्या पूर्ण टीमने अतिशय मेहनत घेऊन हे पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचवले. या सर्वांची मी ऋणी आहे.

✦✦✦

## परिचय

श्रीमती उषा नारायणन् यांनी इंग्लिश लिटरेचरमध्ये एम. ए. केलं असून त्या या विषयातील सुवर्णपदकाच्या मानकरी आहेत. त्यांनी जाहिरात क्षेत्र, माध्यम क्षेत्र आणि बहुराष्ट्रीय कंपन्या यांमधे क्रिएटिव्ह डायरेक्टर, फीचर्स रायटर, वेब एडिटर कम्युनिकेशन्स मॅनेजर अशी विविध पदे भूषवली आहेत. त्यांची पहिली कादंबरी 'द मद्रास मँगलर' ही रोमांचकारी रहस्यकथा जनमानसात आणि माध्यमांमध्येही लोकप्रिय ठरली. त्यांचे पुढले पुस्तक ही 'लव्ह लईज अँड लेऑफ्स' नावाची एक चित्ताकर्षक विनोदी कादंबरी होती. त्यांच्याविषयी अधिक जाणून घ्यायचे असेल, तर WWW.ushanarayanan.com या बेबसाईडला भेट द्या किंवा author@ushanarayanan.com या ईमेल आयडीवर मेल पाठवा. त्यांच्याशी WWW.facebook.com/writerusha किंवा tweet@writerusha येथेदेखील संपर्क साधता येईल.

✦✦✦

## मयूर नौका

''नको, कुँवर नको,'' त्या मुलीचा मंजूळ आवाज आसमंतात घुमला. पार्श्वभूमीला, दैत्यसम्राट कालासुराच्या भव्य प्रासादाभोवतालच्या तलावातील जललहरींचा अनाहत नाद होता. पाठोपाठ एक मोठा सुस्कारा, अस्पष्टसे चीत्कार आणि हलकी कुजबुजही ऐकू आली. मुग्ध प्रेमाची बरसात होत होती.

दालनात पितळेचे मोठमोठे लखलखीत दिवे होते. त्यात तेवणाऱ्या वातींमुळे तिथलं वातावरण उबदार सोनेरी प्रकाशाने भरून गेलं होतं. मंचकावर एक नवयौवना पहुडली होती. तिचं मस्तक एका अतिशय देखण्या अशा पुरुषोत्तमाच्या मांडीवर विसावलं होतं. प्रत्येक हालचालीसरशी त्या अद्वितीय पौरुष लाभलेल्या तरुणाच्या पिळदार शरीराचं सौष्ठव नजरेत भरत होतं. त्याचा चेहरा म्हणजे जणू एखाद्या कसलेल्या कारागिराने कोरलेली मूर्तीच होती आणि या मूर्तीला कुरळ्या केसांच्या महिरपीचं सुरेख कोंदण लाभलं होतं. रेशमी पीतांबर आणि उत्तरीय असलेल्या त्या तरुणाच्या गळ्यात अस्सल पाणीदार मोत्यांचा एक कंठा रुळत होता. हळुवारपणे खाली वाकत आपल्या प्रियेच्या ओठांवर आपले ओठ टेकताना त्याचे तेजस्वी डोळे चमकत होते.

''मी थांबावं, असं खरंच वाटतंय का तुला?'' वामाने विचारलं. ''तुझं प्रेम नाहीये का माझ्यावर?''

''या राज्यातली प्रत्येक मुलगी आपल्यावर जीव ओवाळून टाकेल; पण आपल्या मनात कोण वसलंय?'' त्या मुलीचा स्वर रुसका होता. ''कृत्तिका म्हणते की, आपल्याला भेटल्यापासून तिच्या डोळ्याला डोळा नाही. विकृती तर आपल्या नादाने इतकी खुळावलीये की, ती तिच्या नृत्यमुद्रासुद्धा विसरून गेलीये आणि मी आपल्याकडे नुसतं डोळे वर करून पाहण्याचं धाडस केलं, तरी माझे डोळे काढून हातात दिले जातील, अशी धमकीच मिळालीये ना मला रजनीकडून.''

''अगं पण वेडे, माझं तर तुझ्यावरच सगळ्यात जास्त प्रेम आहे, माहिती नाही का तुला?'' तिच्या चेहऱ्यावर आणि गुलाबपुष्पासारख्या नाजूक ओठांवर चुंबनांचा वर्षाव करत तो म्हणाला. तिच्या डौलदार मानेवर फिरणारा त्याचा हात हळूहळू तिच्या कमनीय कंबरेच्या दिशेने खाली घसरला.

पण यामुळे ताराचं लक्ष विचलित होणार नव्हतं. ''शिवाय आपल्या मातोश्री, म्हणजे राणीसाहेबपण आहेत.'' ती म्हणाली. राणीच्या उल्लेखाबरोबर तिच्या बदामाकृती चेहऱ्यावर आठ्यांचं जाळं पसरलं. ''जेव्हा जेव्हा आपण एखाद्या मुलीच्या सान्निध्यात आहात असं त्यांच्या दृष्टीस पडतं, तेव्हा तेव्हा त्या अगदी रुद्रावतार धारण करतात.''

सतरा वर्षांची तारा तारुण्याच्या उंबरठ्यावर उभी होती. वामाही तिच्याचएवढा होता. कालासुराच्या पट्टराणीने– मायावतीने नुकतंच ताराला आपल्या दासींच्या ताफ्यात रुजू करून घेतलं होतं. त्यामुळे साहजिकच तिला आपल्या स्वामिनीच्या रोषाची धास्ती वाटत होती. आपल्या लाडक्या पुत्राला राजनर्तिका रूपमालासोबत प्रेमालाप करताना पाहिल्यावर राणीने काय केलं, ते ताराला ठाऊक होतं. त्या दिवशी रूपमालाच्या किंकाळ्या ऐकून तिच्या दासींनी आणि रक्षकांनी राजकुमाराच्या दालनाकडे धाव घेतली होती; पण तिथलं दृश्य बघून ते सगळे भीतीने थरथरत जमिनीलाच खिळल्यासारखे उभे राहिले होते. राणीने स्वत: रूपमालाचे लांबसडक केस धरून तिला कुमारांच्या बिछायतीवरून खाली खेचलं होतं आणि लत्ताप्रहारांनी तिला अक्षरशः तुडवलं होतं.

''तू माझी दासी आहेस, गुलाम आहेस. माझंच अन्न खातेस. मी दिलेली वस्त्रं पांघरतेस. मी दिलेल्या दागदागिन्यांनी स्वतःचं सौंदर्य खुलवतेस आणि वर माझ्याच राजबिंड्या पुत्राची अभिलाषा धरतेस?'' संतापाने थरथरणारी राणी एखाद्या भयंकर क्रूर हडळीसारखी कर्कश स्वरात किंचाळत होती. ''तुझे डोळेच फोडून टाकेन. तुझ्या कुटुंबाचा सर्वनाश तर करेनच; पण तुझ्या अख्ख्या गावाचा सत्यानाश करेन. मग तुला गावाच्या वेशीवर टांगेन, म्हणजे तुझ्यासारख्या इतर कुणा वेश्येची हिंमत नाही व्हायची कुमारांकडे नजर वर करून बघायची.''

बोलता बोलता मायावतीने रूपमालेच्या कानातल्या कुड्या ओढून काढल्या. त्याबरोबर तिच्या कानाची पाळी फाटली आणि रक्ताची धार लागली. तिच्या दंडातल्या वाक्या ओरबाडण्यात आल्या. शिवाय कालासुराची नागाच्या सळसळत्या युगुलाची राजमुद्रा असलेला तिचा कमरपट्टाही खसकन् उतरवण्यात आला; पण राणी एवढ्यावरच थांबली नाही, तर तिने रूपमालेच्या नेसत्या वस्त्रालाही हात घातला.

भेदरलेल्या रूपमालेने ओक्साबोक्शी रडत राणीच्या चरणाशी लोळण घेत क्षमायाचना केली; पण राणीने तिला लाथेनेच दूर केलं आणि रक्षकांना खूण करत तिला राजवाड्याबाहेर घेऊन जाण्याचा आदेश दिला. रूपमालेला फरफटत दालनाबाहेर